# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड  **P.S.(ठाणे):** बावधन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0186  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 13/05/2026 18:19

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिंनाक पासून):** 12/03/2026
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 17/03/2026
**Time From (वेळेपासून):** 18:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 13/05/2026  **Time (वेळ):** 17:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 13/05/2026 18:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बावधान पोलीस चौकी,बावधन पोलीस स्टेशन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

POLICE STATION PIMPRI CHINCHWAD



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि पुणे,बावधन,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि पुणे,बावधन,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्योती तांबे | | | 1. बावधान पोलीस स्टेशन,,पिंपरी-चिंचवड,बावधन,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

POLICE STATION PIMPRI CHINCHWAD



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

माझे नाव श्रीमती निता चत्रभुज मिसाळ, वय 47 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे, मोबाईल क्रमांक-9822214414.

आज रोजी समक्ष हजर राहून सरकारतर्फे फिंयादी जबाब देते की, मी दिंनाक 12/03/2026 रोजी 10.30 वाजण्याचे सुमारास ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना श्री दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, (प्रशासन), लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे यांनी आम्हास तक्रारदार श्री. करण भाऊसाहेब पाटील, वय-29 वर्ष, रा. सार्थक शांतीबन सोसायटी, मानाजीनगर, न-हे, पुणे यांची ओळख करून दिली व त्यांची लोकसेवकाविरूद्ध लाचेविषयीची असलेली तक्रार नोंद करून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. सदर कारवाईकामी पोहवा चंद्रकांत जाधव यांना मदतीस देवून पंच साक्षीदार म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील श्री हिरामण शिवाजी शेळके, पद- कनिष्ठ लिपीक व श्री. दिनकर यादव खर्चे पद- शिपाई यांना उपलब्ध करून दिले. आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांची तक्रार तोंडी ऐकुन घेतली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना ला.प्र.वि. पुणे विभागाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबतची सविस्तर माहिती दिली व सदर कारवाईकामी पंच क्र. 1 म्हणून श्री हिरामण शिवाजी शेळके व पंच क्र. 2 म्हणून श्री. दिनकर यादव खर्चे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री करण पाटील यांनी त्यांची लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे-

तक्रारदार यांचे विरोधात हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. 594/2023, भा.दं.वि.कलम 420,406,404,381 वगैरे कलमान्वये दिनाक 07/05/2023 रोजी गुन्हा दाखल झालेला आहे. बावधान पोलीस स्टेशन नवीन झाल्यानंर त्यांच्या गुन्हयाचा तपास बावधन पोलीस स्टेशनकडे आला. सदर गुन्हयाचा तपास बावधन पोलीस स्टेशनच्या ए.पी.आय. ज्योती तांबे यांच्याकडे होता. त्या गुन्हयात तक्रारदार यांना दिनाक 03/10/2025 रोजी अटक करण्यात आली होती. तक्रारदार हे पोलीस कोठडीत असताना गुन्हयाचे तपास अधिकारी ए.पी.आय. श्रीमती ज्योती तांबे यांनी तक्रारदार यांना मारहाण न करण्यासाठी, व तक्रारदार यांचे जवळचे लोक पंच म्हणून देण्याकरीता, घरातील सर्व वस्तु जप्त न करण्यासाठी, बेडया न घालण्याकरीता, न्युज पेपरला माहिती न देऊन बदनामी टाळण्यासाठी, एम.सी.आर.करण्यासाठी, घरातील कोणत्याही नातेवाईकाला आरोपी न करण्यासाठी अशा कारणांकरीता 5,00,000/- रुपयांची मागणी केली होती. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या वडीलांशी बोलणी करून वरील त्रास न होण्यासाठी तक्रारदारांचे वडीलांनी तक्रारदार यांचे समक्ष ए.पी.आय.तांबे व त्यांचे रायटर खाडे यांना रू. 75,000/- दिले. तरीदेखील त्यांनी तक्रारदार यांच्या पत्नी, मेहुणा व सासू यांना त्यांचा गुन्हयात काहीही संबंध नसताना आरोपी म्हणून सदर गुन्हयात दर्शविण्यास सुरवात केली.

त्यानंतर तक्रारदार यांचा गुन्हयातून दिनाक 06/11/2025 रोजी जामीन मंजुर झाला. जामीन अर्जामध्ये न्यायालयाने तक्रारदार यांना दर महिन्याचे चौथ्या सोमवारी हजेरी ठेवलेली आहे. त्याप्रमाणे तक्रारदार हजेरीकरीता बावधान पोलीस स्टेशनला जात होते. दिंनाक 26/01/2026 रोजी तक्रारदार बावधान पोलीस स्टेशनला हजेरीसाठी गेले असताना तेथे जगताप नावाचे पोलीस भेटले तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे चार्जशीट आय.ओ. ला पाठविण्यास सांगण्याबाबत साहेबांना सांगतो असे सांगुन साहेबांकरीता 1,00,000/- रूपये दया असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी दिनाक 14/02/2026 रोजी बावधान पोलीस स्टेशन येथे जाऊन जगताप यांच्या गाडीमध्ये जगताप यांच्याकडे 49,000/- रूपये दिले.

त्यानंतर दिनाक 21/02/2026 रोजी सायंकाळी तक्रारदार यांनी बावधन पोलीस चौकी येथे गुन्हयाचे तपास अधिकारी श्रीमती तांबे यांना भेटुन गुन्हयामध्ये त्यांच्या नातेवाईकांचा संबंध नसल्याने त्यांना गुन्हयातून काढून टाकण्याची व चार्जशीट लवकरात लवकर पाठविण्याची विनंती केली असता सपोनि श्रीमती ज्योती तांबे यांनी तक्रारदारांना "त्याकरीता तुम्हाला पैसे दयावे लागतील" असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "किती पैसे

POLICE STATION PIMPRI CHINCHWAD ★ BAVDHAN

Scanned with CamScanner

दयावे लागतील?" असे विचारले त्यावर श्रीमती तांबे यांनी मला,"तु किती देऊ शकतोस?"असे विचारले. तेव्हा तक्रारदार त्यांना माझी आर्थिक परिस्थिती नसल्याने फक्त 50,000/- देऊ शकतो असे बोलले असता त्यावर तांबे यांनी "त्याच्या डबल कर" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 1 लाख रूपयांची मागणी केली. त्यापैकी 48,500/- रूपये तक्रारदार यांनी दिंनाक 23/02/2026 रोजी बावधान पोलीस स्टेशन येथील पार्कीगमध्ये त्यांना नेऊन दिले. तसेच उर्वरीत दीड हजार रूपये ए.पी.आय.तांबे यांचे रायटर उमेश खाडे यांच्याकडे दिले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना उर्वरीत पैसे जेव्हा शक्य होतील त्यावेळी देईल असे सांगितले.

दिंनाक 07/03/2026 रोजी तक्रारदार यांचा मेहुणा प्रतिक कवडे यास त्याचा मोबाईल नंबर 9673674743 यावर खाडे पोलीस यांचा मोबाईल नंबर 7350755284 यावरुन व्हॉटसअप कॉल आला व त्यावेळी त्यांनी तांबे मॅडमनी बोलावले असल्याचा निरोप दिलेला आहे. ए.पी.आय.तांबे हा नातेवाईकांना कॉल करून तक्रारदार यांना उर्वरीत लाचेची रक्कम देण्यासाठीच बोलावित असून त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेतल्याशिवाय तक्रारदार यांचे विरोधातील गुन्हयाचे दोषारोपपत्र पाठविणार नाहीत व नातेवाईकांना गुन्हयातून काढणार नाहीत अशी खात्री झाल्याने व त्यांना उर्वरीत 50,000/- रुपये लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार यानी दिंनाक 12/03/2026 रोजी ला.प्र.वि. पुणे कार्यालयात येवुन ए.पी.आय.श्रीमती ज्योती तांबे, बावधान पोलीस स्टेशन यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी अशा आशयाची स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली. त्यावर मी व पंचानी समक्ष सही केलेली आहे.

सदर लेखी तक्रार तक्रारदार यांनी दिल्यानतर लोकसेविका एपीआय तांबे यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत तक्रारदार यांना बावधन पोलीस चौकी येथे पाठवून पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानुसार सापळा पथक, तक्रारदार व दोन्ही पंच असे आम्ही पडताळणी कारवाईसाठी आवश्यक ते साहित्य घेवुन सरकारी वाहन क्र.MH12 UC 4109 ने तसेच तक्रारदार त्यांचेकडील खाजगी वाहन अक्टीव्हा गाडी क्र. MH-12-WW-9364 ने 16.40 वाजता रवाना होवुन कोथरुड रोडवरील चांदणी चौकाजवळील रॉयल एनफिल्ड बुलेट शोरुमजवळ 17.36 वाजता पोहचलो.

त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रणकरीता वापरण्यात येणारा शासकीय सिल्व्हर रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर त्यांचे मॉडेल नंबर ICD-UX560F सिरीयल नंबर 2457505 असा असलेला त्यामध्ये नवीन सीलपॅक व्हीएम एलाईट कंपनिचे 32 जीबी क्षमतेचे त्याचे एका बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस EETF32GKN0225 असे वर्णनाचे मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर व्हिडीओ चित्रिकरणासाठी शासकीय सोनी कंपनीच्या व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये एक नवीन सीलबंद पाकीटामधील व्हीएम एलाईट कंपनिचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड घातले. त्याचे एका बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC Iव त्याचे मागील बाजुस MR-K 12/25 C E MMC32GB8T23-A9 YDH AX215F 2512 MADE IN TAIWANअसे छापलेले होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री पाटील, पंच क्र.01 श्री. शेळके व पंच क्र.2 श्री. खर्चे यांची पडताळणी कार्यवाहीकरीताची निवेदने 17.52 ते 18.05 वा. दरम्यान ध्वनिमुद्रीत केली. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण देखील केले. आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सर्व आवश्यक सुचना दिल्या व त्यानंतर 18.11 वाजता व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालु करून तक्रारदार श्री पाटील व पंच क्र 1 श्री शेळके यांना तक्रारदार यांचे अक्टीव्हा गाडी क्र. MH-12-WW-9364 हीवरून बावधान पोलीस चौकी येथे रवाना केले. आम्ही उर्वरित पथक पंच क्र.2 यांचेसह सदर ठिकाणी थांबुन राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.1 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेवरून पो.हवा.जाधव यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन 19.21 वा. बंद केला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 यांनी पडताळणी दरम्यान घडलेली हकिकत सांगितली की, तक्रारदार व पंच क्र.1 असे बावधन पोलीस चौकी येथे गेल्यानंतर तेथे एपीआय तांबे उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी एपीआय तांबे यांचेशी मोबाईलद्वारे संपर्क साधला असता एपीआय तांबे या बावधान चौकी येथे आल्या. त्यावेळी तक्रारदार व एपीआय तांबे असे तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे दोषारोपपत्र दाखल करण्याचे संदर्भाने चर्चा करत एपीआय तांबे यांचे केबिनमध्ये गेले त्यावेळी पंच क्र.1 तक्रारदार यांचे सोबत होते. त्यानंतर तक्रारदार व लोकसेविका यांचेत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी "मग हयाच मग हयाच कस करायच" असे पुर्वी ठरलेल्या लाच रकमेबाबत एपीआय तांबे यांना विचारले असता त्यावर एपीआय तांबे यांनी "आणलेत व्हय" अशी तक्रारदार यांना विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी "आणले नाही मी तेच म्हणल जरा काय तरी कमी करा" अशी एपीआय तांबे यांना विंनती केली. त्यावर एपीआय तांबे यांनी "कमी... मला वाटल वाढवायला आलास" असे बोलून यापुर्वी ठरलेल्या लाच रकमेबाबत दुजोरा दिला. त्यानंतर दोघांमध्ये आणखी चर्चा होवून तक्रारदार यांनी "अन ते बाकी मग हयाच



Scanned with CamScanner

आहे ते कस खाडे साहेबांसोबतच का?" असे लोकसेविका तांबे यांना विचारले असता लोकसेविका तांबे यांनी "काय? अरे स्पष्ट बोल दार बी लावलय काय एवढ विचार करतो" असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार बोलले की, "अहो पैशाच ओ... जरा कमी करा काहीतरी ...अण वाढवायच असतील तर अजून काय मला मदत करणार ते पण सांगा" असे लोकसेविका श्रीमती तांबे यांनी तक्रारदारांना लाचेची रक्कम वाढविण्यासदर्भात बोललेल्या वाक्याचे अनुषंगाने तक्रारदार बोलले. त्यावर एपीआय तांबे यांनी "आ" असे बोलून विचारणा केली त्यावर तक्रारदार हे "काय आता हे बघा. माझ्याकडे होते ते मी लगेच दिले. तुम्हाला पण दिले अण वर पण दिले..तुम्हाला माहितीये" असा यापुर्वी दिलेल्या लाच रकमेबाबत उल्लेख करून बोलणी केली. त्यावर एपीआय तांबे यांनी तक्रारदार यांना गुन्हयाचे तपासात मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर दोघेही सदर खोलीच्या बाहेर आले त्यावेळी पंच क्र.1 यांचेसमक्ष दोघांमध्ये आणखी चर्चा होवून लोकसेविका एपीआय तांबे यांनी तक्रारदार यांना परवा शनिवारी या असे सांगुन जाण्यास सांगितले. त्यामुळे तक्रारदार व पंच क्र.1 असे परत आले. अशी हकिकत सांगुन झाल्यानंतर ती खरी असलेबाबत आम्ही व्हॉईस रेकॉर्डमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत झालेली फाईल क्र.2 मधील संभाषण ऐकुन त्याबाबत खात्री केली.

वरिल झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार व लोकसेविका यांचेत यापुर्वी ठरलेल्या लाच रकमेबाबत चर्चा होवून लोकसेविका तांबे यांनी तक्रारदार यांचेकडून यापुर्वी लाच रक्कम स्वीकारल्याचे व उर्वरित लाच रक्कम देण्याचे संदर्भाने झालेल्या संभाषणास एपीआय तांबे या लोकसेविका असून देखील त्यांनी कोणताही विरोध न दर्शविता दुजोरा दिला परंतु तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे नेमकी किती लाच रक्कम स्वीकारली व किती स्वीकारण्याचे बाकी आहे याचा स्पष्ट उल्लेख संभाषणामध्ये न झाल्याने त्याबाबत सर्वानुमते दि.14/03/2026 रोजीच्या भेटी दरम्यान पुन्हा पडताळणी करण्याचे ठरवून दि.12/03/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 12/03/2026 रोजी ठरल्याप्रमाणे दि. 14/03/2026 रोजी पडताळणी कारवाईचे आयोजन केले. पो. हवा.जाधव यांचे ऐवेजी सहा.फौज. बाठे, पो.कॉ.तावरे व म.पो.कॉ.शेटे यांना कारवाईत सामील केले. पडताळणी कारवाईकरीता शासकीय वाहनाने बावधान येथे जाऊन पंच व तक्रारदार यांचे निवेदन घेऊन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना लोकसेविका श्रीमती तांबे यांची भेट घेण्याकरिता तक्रारदाराच्या खाजगी दुचाकी वाहनाने बावधान पोलीस चौकी येथे रवाना केले असता त्यांची भेट झाली नाही. त्यामुळे आम्ही तक्रारदार यांना पुढील पडताळणी बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की उदया रोजी रविवार असल्याने लोकसेविका एपीआय तांबे यांची साप्ताहिक सुट्टी असण्याची शक्यता आहे. तसेच सोमवारी त्यांनी कोर्टाची तारीख असल्याने ती झाल्यानंतर लोकसेविका एपीआय तांबे यांचे ठावठिकाण्याची गोपनियरित्या माहिती घेवून कळवितो. त्यानुसार तक्रारदार यांनी दि.16/03/2026 ~~रोजी~~ संपर्क साधल्यानतर पुढील पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून दि. 14/03/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली.

दि.17/03/2026 रोजी तक्रारदार यांनी कळविलेवरून आम्ही सापळा पथक व नमूद दोन्ही पंचासह वरिल नमूद शासकीय वाहनाने सुमारे 18.15 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन रवाना होवून सुमारे 19.18 वाजता मुंबई बँगलोर हायवेवरील चांदणी चौकानजीक असलेल्या ब्रिजचे खालील बाजुस रोडलगत तक्रारदार यांना पुढील पडताळणी कारवाईकामी भेटलो. सदर पडताळणी कारवाईकरीता दि.14/03/2026 रोजीचे पडताळणी स्थगित पंचनाम्या दरम्यान ध्वनिमुद्रणाकरीता व व्हिडीओ रेकॉर्डींगकरीता वापरलेले नमूद वर्णनाचे मेमरीकार्ड सलग पुढे वापण्याचे सर्वानुमते ठरवून दोन्ही मेमरी कार्ड शासकीय व्हॉईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये घातले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि तावरे यांनी तक्रारदार श्री पाटील, पंच क्र.01 श्री. शेळके व पंच क्र.2 श्री. खर्चे यांची पडताळणी कार्यवाहीकरीताची निवेदने सुमारे 19.23 वाजता ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी मपोशि शेटे यांनी व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे चित्रिकरण केले.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर 19.36 वाजता चालू करून पोशि तावरे यांचे मार्फतीने तक्रारदार पाटील यांना लावला व त्याना पंच क्र 1 श्री शेळके यांचेसह तक्रारदार यांची खाजगी दुचाकी अक्टीव्हा गाडी क्र. MH-12-WW-9364 याचेवरुन बावधान पोलीस चौकी येथे पडताळणीकरीता रवाना केले व बाकी उर्वरित पथक पंच क्र.2 यांचेसह थांबुन राहिलो.

त्यानंतर तक्रारदार श्री पाटील व पंच नं.01 असे परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आले. तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन 20.34 वा. बंद केला. त्यावेळी तक्रारदार व पंच क्र. 1 यांनी पडताळणी दरम्यानची हकिकत सांगितली की, तक्रारदार व पंच क्र.1 असे बावधन पोलीस चौकी येथे गेले असता तेथे एपीआय तांबे उपस्थित नव्हत्या. त्यांनी तक्रारदारांना चौकीतील पोलीस अंमलदार यांचे फोनवरून एपीआय तांबे यांना संपर्क साधला असता त्यांनी तक्रारदार यांना बावधन पोलीस स्टेशनला बोलाविले.त्यानुसार तक्रारदार



Scanned with CamScanner

यांनी पंच क्र.1 यांचेसोबत बावधान पोलीस ठाणे येथे जावुन लोकसेविका एपीआय तांबे यांची भेट घेतली.

त्यावेळी तक्रारदार व लोकसेविका एपीआय तांबे यांचेत तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने व तक्रारदार यांचे नातेवाईकांनी केलेल्या अटकपुर्व जामीन अर्जाचे संदर्भाने व दोषारोपपत्र दाखल करणेसंदर्भाने चर्चा झाली. त्यानतर लोकसेविका व तक्रारदार असे बोलत बोलत सदर खोलीचे बाहेर आले. त्यावेळी पंच क्र.1 हे देखील त्यांचे सोबतच होते. त्यांचे समक्ष झालेल्या चर्चे दरम्यान "मॅडम ऐका ना, मॅडम--- ऐका ना, ते आता जे राहिलेका" असे तक्रारदार एपीआय तांबे यांना उर्वरित बाकी असलेल्या लाचेच्या रकमेबाबत बोलले असता त्यावर एपीआय तांबे "अरे त्याची नको काळजी करु...उदयाचं ऑर्डर होऊ देकी, आहे वेळ आपल्याकडे असे बोलल्या. त्यानंतर दोघांत आणखी चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार लोकसेविका तांबे यांना बर मॅडम मी काय म्हणतो जे राहिलेले पन्नास आहेत असे बोलले असता लोकसेविका तांबे "अरे तुला लय वेळ देते मी" असे बोलल्या. त्यावर तक्रारदार यानी उरलेली रक्कम कमी करणेबाबत एपीआय तांबे यांना विनंती केली असता लोकसेविका तांबे यांनी "किती कमी करु दहा?" असे बोलल्या. त्यावर तक्रारदार यांनी "आता तुम्हाला तर माहितीये पन्नास हजार माझ्याकडे होते म्हणुन तुम्हाला लगेच दिले " असे बोलले. त्यावर एपीआय तांबे या तक्रारदार यांना पुन्हा रक्कम कमी करण्याचे उद्देशाने "पाच?" अशा बोलल्या व त्यानंतर "बोलु आपण बोलु" असे बोलून एपीआय तांबे यांनी तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे तक्रारदार यांचेकडून यापुर्वी रु. 50,000/- लाचेची रक्कम स्वीकारल्याचे व उर्वरीत बाकी रु.50,000/- रकमेपैकी 10 किंवा 5 हजार कमी करुन देण्याचे उद्देशाने बोलणी केली व सदर रक्कम तक्रारदार यांचे नातेवाईकांच्या अटकपुर्व जामीन अर्जाचा अंतिम आदेश झाल्यानंतर भेटण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार व पंच असे परत निघाले असता एपीआय तांबे यांचे साहेब पोलीस निरीक्षक विभुते व त्यांचे सोबत पोलीस अंमलदार जगताप आल्याचे पाहून त्याबाबत तक्रारदार यांनी एपीआय तांबे यांना माहिती दिली व पहिले साहेबांशी तुम्ही बोला नंतर मी बोलतो अशी विंनती केली. त्यावरुन एपीआय तांबे यांनी पोलीस निरीक्षक विभुते यांची त्यांचे केबिनमध्ये जावून पोलीस अंमलदार जगताप यांचे समक्ष भेट घेवून तक्रारदार यांचे गुन्हयाबाबत चर्चा केली व बाहेर केबिन बाहेर आल्या. त्यानंतर त्यांचे सांगणेवरुन तक्रारदार यांनी पंच क्र.1 यांचेसह पोलीस निरीक्षक विभुते यांची त्यांचे केबिनमध्ये पोलीस अंमलदार जगताप यांचे समक्ष जावून भेट घेतली परंतु त्या दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये पोलीस निरीक्षक विभुते अथवा जगताप यांनी लाच मागणी केल्याचे निष्पण्ण झाले नाही.

एकंदरीत तक्रारदार यांचे तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेविका तांबे यांनी तक्रारदार यांचेकडून यापुर्वी रु.50,000/- लाचेची रक्कम त्यांचे स्वत:करीता स्वीकारल्याचे व उर्वरीत 50,000/- रुपयांपैकी 10 किंवा 5 हजार रुपये कमी करुन उर्वरित रक्कम स्वीकारण्याचे पंचासमक्ष मान्य केल्याचे निष्पन्न झाले परंतु तक्रारदारांच्या नातेवाईकांचा अटकपुर्व जामीन अर्जाचा अंतिम आदेश झाल्यानंतर भेटण्यास सांगितल्याने दि. 17/03/2026 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली. त्याप्रमाणे सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.01/04/2026 रोजी मा. न्यायालयाने तक्रारदार यांचे नातेवाईकांच्या अटकपुर्व जामीन अर्जाचा अंतिम आदेश दिला. सदर अंतिम आदेश दिल्यानतर एपीआय तांबे या लाच रक्कमेचा स्वीकार करतील म्हणून सर्वानुमते दि. 02/04/2026 रोजी सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरविण्यात आले. त्याअन्वये दि. 02/04/2026 रोजी सापळा निवेदन घेवून दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांनी एपीआय तांबे यांच्या ठावठिकाण्याकरीता त्यांना फोन केले असता एपीआय तांबे यांचा फोन बंद मिळून आला. त्यामुळे दि. 02/04/2026 रोजीची कारवाई स्थगित करुन सविस्तर पंचनामा केला. सदर कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रणाकरीता एच.पी.कपनीचे 32 जी.बी. क्षमतेचे एका बाजुस hp 32 GB MicroSD HC 10 व मागील बाजुस 003221X05 K 2443101820M असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड वापरण्यात आले होते.

त्यानंतर नमूद लोकसेविकेकडून लाच रकमेसाठी काही संपर्क होतो किंवा कसे? याकरीता वाट पाहण्याचे ठरवून तक्रारदार यांनी दि.07/04/2026 पर्यंत वाट पाहिली परंतु नमूद लोकसेविकेकडून त्यांना कोणताही संपर्क झाला नाही. त्यामुळे त्यानंतर दि.08/04/2026 रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे समक्ष हजर होवून दोन्ही पंचासमक्ष कळविले की, एपीआय तांबे यांना संशय आल्याने लाच रकमेकरीता संपर्क केला नाही तसेच तक्रारदार यांचे नातेवाईकांचे अटकपुर्व जामीनाचा निकाल देखील तक्रारदार यांचे विरोधात गेल्याने नमूद लोकसेविका तक्रारदार यांचेकडून यापुढे लाच रक्कमेचा स्वीकार करणार नाहीत म्हणून आता पर्यंत झालेल्या कारवाईवरुन योग्य ती कारवाई करण्याची तक्रारदार यांनी विंनती केल्याने सर्वानुमते पुढील सापळा कारवाई आजमाविण्याचे कामकाज बंद करण्यात आले.



Scanned with CamScanner

तरी तक्रारदार श्री. करण पाटील यांनी दि.12/03/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान त्याच दिवशी 18.11 ते 19.20 वाजता दरम्यान बावधान पोलीस चौकी येथे व दि. 17/03/2026 रोजी 19.36 ते 20.34 वाजताचे दरम्यान बावधन पोलीस स्टेशन येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार व त्यांचे नातेवाईकांविरुध्द बावधन पोलीस ठाणेस तपासाकरीता असलेल्या गुन्हयात तपास अधिकारी म्हणून गुन्हयात मदत करण्यासाठी, नातेवाईकांना अटक न करण्यासाठी व दोषारोप लवकर सादर करण्यासाठी लोकसेविका एपीआय तांबे यानी तक्रारदार यांचेकडून स्वत.करीता यापुर्वी रु 50,000/- लाचेची रक्कम स्वीकारल्याचे व रु.50,000/- स्वीकारण्याचे बाकी असल्याचे मान्य करून बाकी असलेल्या रु.50,000/- रकमेपैकी 10 किंवा 5 हजार कमी करुन देण्याचे उद्देशाने बोलणी करून लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. म्हणून आमची सहायक पोलीस निरीक्षक, श्रीमती ज्योती तांबे, नेमणुक-बावधान पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशिर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखीत केला असून तो बरोबर व खरा आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

Anil Kondiba Vibhute(I (Inspector)) / PI

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.(क्र.):**

**Rank (पद):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

Registered by (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Anil Kondiba Vibhute

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

BAVDHAN POLICE STATION PIMPRI CHINCHWAD



Scanned with CamScanner